जा.क्र. पोआ/ 3263 /२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
दिनांक :-२१.०५.२०२०

(१)

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक २२/०५/२०२० चे ००:०१ ते दिनांक ३१/०५/२०२० चे २४:०० वा.च्या संचारास मनाई तसेच जमावबंदी व वाहतुक मनाईबाबतचा सुधारीत आदेश. (पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कंन्टेन्मेन्ट झोन वगळून उर्वरीत भागासाठी - नॉन रेड झोनसाठी)

सुधारीत आदेश –

२) ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे, असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. गृह मंत्रालय भारत सरकार आदेश क्र. ४०-३/२०२०-डीएम-आय(ए) दि.१७-०५-२०२० अन्वये आणि महाराष्ट्र शासनाने आदेश नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/ डीआयएसएम-१ दिनांक. १७/०५/२०२० अन्वये कोव्हिड- १९ चे नियंत्रणासाठी राज्यात यापुर्वी जारी करण्यात आलेल्या लॉकडाऊन आदेशाची मुदत दि. ३१/०५/२०२० अखेर वाढविलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे दिनांक १९/०५/२०२० चे आदेशान्वये कोव्हिड - १९ चे प्रतिबंधासाठी राज्यात वाढवलेल्या लॉकडाऊनच्या मुदतीसाठी सुधारित मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत.

३) भारत सरकार आरोग्य मंत्रालय, तसेच महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, अशा मार्गदर्शक सुचना पारित केल्या आहेत. तसेच अत्यावश्यक सेवा वगळता सायंकाळी ०७/०० ते सकाळी ०७/०० वाजण्याचे दरम्यान व्यक्तींच्या हालचालीस सक्त मनाई केली आहे. त्यासाठी नागरिकांना नियंत्रित करणे व त्यांच्या हालचालींना प्रतिबंध करणे आवश्यक बनले आहे. यास्तव **सायंकाळी ०७/०० ते सकाळी ०७/०० वाजण्याचे दरम्यान अत्यावश्यक सेवा वगळता कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही रस्त्यावर सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर गल्लोगल्ली याठिकाणी संचार करणे,वाहतुक करणे, फिरणे,उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे अशा सर्व कृत्यास तसेच उर्वरित वेळी सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे थांबणे किंवा चर्चा करणे**, तसेच कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणुंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस व खालील व्यक्तीस आणि आस्थापना यांना उद्देशुन काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

४) त्याअर्थी मी **संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड,** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील घोषित कंन्टेन्मेन्ट झोन्स व्यतिरिक्त उर्वरीत क्षेत्रासाठी फौजदारी प्रकिया संहिता कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्रमांक ५ मधील नमुद अधिसुचनांच्या अधीन राहुन **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे** दिनांक **२२/०५/२०२० चे ००:०१ ते दिनांक ३१/०५/२०२० चे २४:०० वा. पर्यंत सुधारीत संचार बंदी तसेच जमावबंदी व वाहतुक मनाईबाबतचा आदेश लागु करीत आहे.**

५) **खालील बाबींना मनाई असेल.**

१) सर्व प्रकारची देशांतर्गत आणि अंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतुकीस मनाई राहील.(अपवाद -देशांतर्गत वैदयकीय सेवा, देशांतर्गत हवाई रुग्णवाहिका आणि सुरक्षिततेच्या कारणांसाठी किंवा गृहविभागाने परवागनी दिलेले कारणांसाठी)

२) मेट्रो रेल्वे सेवा बंद राहील.

Scanned with CamScanner

३) शाळा, महाविदयालये, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण देणा-या संस्था यांना बंदी राहील. ऑनलाईन शिक्षण/ दुरस्थ शिक्षण यांस परवागनी चालु राहील. आणि त्यांस प्रोत्साहन देण्यात येईल.

४) हॉटेल,उपहारगृहे आणि इतर आदरातिथ्य सेवा बंद राहतील. (अपवाद – ज्या ठिकाणी आरोग्य/ पोलीस/शासकीय अधिकारी/आरोग्य सेवक/अडकुन पडलेले नागरिक तसेच पर्यटक यांच्यासाठी राहण्यास तसेच ज्या ठिकाणी विलगीकरण सुविधा आहे ती सुरु राहतील.आणि बस आगार रेल्व स्टेशन विमानतळ येथील कॅन्टींन येथील व्यवस्था सुरु राहील.तसेच अन्न पदार्थाची घरपोच सेवा देणा-या उपहारगृहांना व स्वयंपाकगृहांना परवानगी राहील.

५)सर्व सिनेमागृहे, शॉपिंग मॉल, व्यायामशाळा,जलतरण तलाव ,करमणुक उदयाने, नाटयगृह, बार,सभागृहे,असेंबली आणि तत्सम ठिकाणे बंद राहतील.

६) सर्व प्रकारचे सामाजिक/राजकीय/क्रिडा/मनोरंजन/शैक्षणिक/सांस्कृतिक/धार्मिक कार्यक्रमांना व इतर मेळाव्यांना आणि मोठया संख्येने एकत्र जमण्यास मनाई राहील.

७) सर्व धार्मिक स्थळे/ प्रार्थनास्थळे नागरिकांसाठी बंद राहतील. धार्मिक कार्यक्रम/मेळावे/प्रवचने इत्यादीस सक्त मनाई आहे.

६) **व्यक्तींच्या वाहतुकीबाबत**

१) परदेशी नागरिकांच्या पारगमनाच्या नियोजनाबाबत केंद्रीय गृहमंत्रालयाचे दिनांक ०२/०४/२०२० चे आदेशातील नमुद प्रमाणित कार्यपध्दतीनुसार केली जाईल.

२) राज्यात अडकुन पडलेल्या स्थलांतरीत मजुरांची वाहतुक केंद्रीय गृहमंत्रालयाचे दिनांक १९/०४/२०२० चे आदेशातील नमुद प्रमाणित कार्यपध्दतीनुसार केली जाईल.

३) अडकुन पडलेले स्थलांतरित मजुर यात्री, पर्यटक,विदयार्थी आणि इतर व्यक्तींची वाहतुक केंद्रीय गृहमंत्रालयाचे दिनांक २९/०४/२०२० चे आदेशातील नमुद प्रमाणित कार्यपध्दतीनुसार केली जाईल.

४) परदेशात अडकलेले भारतीय नागरिक आणि परदेशात जाणा-या विशिष्ट व्यक्ती यांच्या हालचाली (आगमन व पारगमनाबाबत) केंद्रीय गृहमंत्रालयाचे दिनांक ०५/०५/२०२०चे आदेशातील नमुद प्रमाणित कार्यपध्दतीनुसार केली जाईल.

५) रेल्वेने होणारी लोकांची वाहतुक केंद्रीय गृहमंत्रालयाचे दिनांक ११/०५/२०२० चे आदेशातील नमुद प्रमाणित कार्यपध्दतीनुसार केली जाईल.

७) **कोविड १९ अनुषंगाने राष्ट्रीय निर्देश**

अ) **सार्वजनिक ठिकाणे-**

१.सर्व सार्वजनिक ठिकाणी नागरीकांनी तोंडावर मास्क परिधान करणे बंधनकारक आहे.

२.सर्व सार्वजनिक ठिकाणांचे व वाहतुकीचे प्रभारी यांनी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार सामाजिक अंतर पाळले जात असल्याबाबत खात्री करावी.

३.लग्न सोहळयासारख्या कार्यक्रमांना ५० पेक्षा जास्त लोकांना परवानगी दिली जाणार नाही.

४.अंतिमसंस्कार/ अंत्यविधी सारख्या कार्यास ५० पेक्षा जास्त लोकांना परवानगी दिली जाणार नाही.

५.सार्वजनिक ठिकाणी व कार्यालयाच्या ठिकाणी थुंकणा-या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

६.सार्वजनिक ठिकाणी मदयपान,पान, गुटखा, तंबाखु खाण्यास सक्त मनाई आहे.

७.दुकानांच्या ठिकाणी किमान सहा फुट सामाजिक अंतर पाळणे गरजेचे असुन एका वेळी ५ पेक्षा जास्त लोक असु नयेत.

ब) **कार्यालयाची ठिकाणे -**

१.जास्तीत जास्त शक्यतो वर्क फ्रॉम होम कार्यपध्दतीचा वापर करावा.

२.कार्यालयात तसेच कामाचे ठिकाणी, दुकाने, बाजार पेठा आणि औद्योगिक व वाणिज्यीक आस्थापनाच्या ठिकाणी कामगारांचे शिफ्ट्स मध्ये योग्य आणि पुरेसे अंतर असणे व स्टाफचे जेवणाच्या सुट्टीच्या वेळा नियोजित करणे याकडे कार्यालयीन प्रमुखाने लक्ष पुरवावे.

३. सर्व कामाच्या ठिकाणांचे प्रभारी यांनी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार कामाच्या ठिकाणी तसेच कंपनीचे वाहतुकीबाबत सामाजिक अंतर पाळले जात असल्याबाबत खात्री करावी. कामगारांच्या व कर्मचा-यांच्या कामाच्या शिफ्टस् आणि भोजनाचे वेळा टप्याटप्याने ठेवाव्यात.

Scanned with CamScanner

४. कामाच्या ठिकाणी प्रवेशद्वारावर येण्याच्या व जाण्याच्या ठिकाणी व सर्व सामान्य क्षेत्रात थर्मल स्कॅनिंग, हॅन्डवॉश व सॅनिटायझरसाठी टच फ्री मशिन्सचा वापर करावा. तसेच कामाच्या ठिकाणी हॅन्डवॉश व सॅनिटायझरची पुरेशी उपलब्धता केलेली असावी.

५.कामाच्या ठिकाणाचे तसेच तेथील सामान्य सुविधांचे व लोकांच्या सतत संपर्कात येणा-या बाबींचे वेळोवेळी तसेच शिफ्टस् दरम्यान संपुर्ण सॅनिटायझेशन करावे. उदा. दरवाजाचे हॅन्डल्स

६. कोविड १९ संदर्भात औषधोपचार उपलब्ध असलेल्या रुग्णालयांची यादी कामाचे ठिकाणी उपलब्ध करावी व कोणत्याही कामगारास कोविड १९ ची लक्षणे आढळुन आल्यास तात्काळ संबंधीत रुग्णालयात औषधोपचासाठी उपचारकामी पाठवावे.

## ८) रात्रीची संचारबंदी –

संध्याकाळी ०७/०० वाजलेपासुन ते सकाळी ०७/०० वाजलेचे दरम्यान अत्यावश्यक सेवा वगळता व्यक्तींच्या हालचालींवर सक्त बंदी असेल. कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही रस्त्यावर सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर गल्लोगल्ली याठिकाणी संचार करणे, वाहतुक करणे, फिरणे,उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे अशा सर्व कृत्यास मनाई राहील. (दरम्यान मुदतीत अत्यावश्यक हालचालीबाबत संबधित व्यक्ती पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात महापालिकेकडील आणि ऊर्वरीत क्षेत्रात स्थानिक पोलीस स्टेशनकडील अधिकृत पास सोबत बाळगतील.)

## ९)असुरक्षित व्यक्तींच्या संरक्षणाबाबत

६५ वर्षावरील जेष्ठ नागरिक, विकलांग व्यक्ती, गरोदर महिला आणि दहा वर्षाखालील मुले यांनी अत्यावश्यक आणि वैदयकीय कारण वगळता घरातच थांबणे आवश्यक आहे.

## १०)आरोग्य सेतुच्या वापराबाबत

१) आरोग्य सेतु ॲप हे कोरोना संसर्गाच्या संभाव्य जोखमीची अगोदर ओळख करण्यास मदत करते. आणि ते व्यक्तींस आणि समाजास ढाल म्हणुन मदत करते.

२) कार्यालये व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता ठेवण्याच्या दृष्टीने अनुरुप मोबाईल फोन असलेल्या १००% सर्व कर्मचा-यांनी आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्याबाबत कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी.

३) नागरीकांनी त्यांच्या मोबाईल फोनवर आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्यांची आरोग्य विषयक दैनंदिन माहिती अदयावत करावी.

## ११) विशेष प्रकरणांमध्ये व्यक्ती व वस्तु/मालाची हालचाल सुनिश्चित करण्यासाठी विशेष निर्देश-

i) अंतरराज्य व राज्यांतर्गत सर्व वैदयकीय व्यावसायिक, स्वच्छता कर्मचारी, परिचारीका, लॅबटेक्नीशीयन, वैदयकीय कर्मचारी, रुग्णवाहीका व हॉस्पीटलशी संबंधीत सर्व सेवांना कोणत्याही प्रकारच्या निर्बंधाशिवाय परवानगी राहील.

ii) सर्व प्रकारच्या वस्तु/ मालाची आंतरराज्य वाहतुक तसेच रिकामे मालवाहु ट्रक वाहने यांना परवानगी राहील.

## १२) नॉन रेड झोन करीता – खालील सर्व बाबींना अटीच्या अधिन राहुन परवानगी आहे.

या आदेशाच्या अनुच्छेद ५ मध्ये समाविष्ट बाबी वगळता तसेच स्पष्टपणे प्रतिबंधीत बाबी वगळता किंवा बंदी घातलेल्या बाबी वगळता अन्य सर्व बाबींना खालील अटींच्या अधिन राहून परवानगी आहे.

अ)परवानगी दिलेल्या बाबीं चालु करण्याकरीता कोणत्याही शासकीय प्राधीका-यांकडुन अनुमती/ मंजुरी घेण्याची आवश्यकता नसेल.

ब)क्रीडा संकुले, स्टेडीयम आणि सार्वजनिक मोकळया जागा वैयक्तिक व्यायामासाठी खुल्या राहतील. तथापि, प्रेक्षक व सामुहीक व्यायामप्रकार/ कार्यक्रम यांना परवागी नाही. सर्व शारिरीक व्यायाम व इतर हालचाली योग्य शारिरीक सामाजिक अंतराचे नियम पाळुन करता येतील.

क) सर्व सार्वजनिक व खाजगी प्रवासी वाहतुकीचे व्यवस्थापन खालील प्रमाणे चालु राहील

| | |
|---|---|
| दुचाकी | १ चालक |
| तीन चाकी | १ चालक व २ प्रवासी |
| चार चाकी | १ चालक व २ प्रवासी |

ड)टॅक्सी / कॅब / ॲटो रिक्षा यांना एक चालक व दोन प्रवासी अशी वाहतुक करण्यास परवानगी राहील.

Scanned with CamScanner

४. कामाच्या ठिकाणी प्रवेशद्वारावर येण्याच्या व जाण्याच्या ठिकाणी व सर्व सामान्य क्षेत्रात थर्मल स्कॅनिंग, हॅन्डवॉश व सॅनिटायझरसाठी टच फ्री मशिन्सचा वापर करावा. तसेच कामाच्या ठिकाणी हॅन्डवॉश व सॅनिटायझरची पुरेशी उपलब्धता केलेली असावी.

५.कामाच्या ठिकाणाचे तसेच तेथील सामान्य सुविधांचे व लोकांच्या सतत संपर्कात येणा-या बाबींचे वेळोवेळी तसेच शिफ्टस् दरम्यान संपुर्ण सॅनिटायझेशन करावे. उदा. दरवाजाचे हॅन्डल्स

६. कोविड १९ संदर्भात औषधोपचार उपलब्ध असलेल्या रुग्णालयांची यादी कामाचे ठिकाणी उपलब्ध करावी व कोणत्याही कामगारास कोविड १९ ची लक्षणे आढळुन आल्यास तात्काळ संबंधीत रुग्णालयात औषधोपचारासाठी उपचारकामी पाठवावे.

८) रात्रीची संचारबंदी --

संध्याकाळी ०७/०० वाजलेपासुन ते सकाळी ०७/०० वाजलेचे दरम्यान अत्यावश्यक सेवा वगळता व्यक्तींच्या हालचालींवर सक्त बंदी असेल. कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही रस्त्यावर सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर गल्लोगल्ली याठिकाणी संचार करणे, वाहतुक करणे, फिरणे,उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे अशा सर्व कृत्यास मनाई राहील. (दरम्यान मुदतीत अत्यावश्यक हालचालीबाबत संबधित व्यक्ती पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात महापालिकेकडील आणि ऊर्वरीत क्षेत्रात स्थानिक पोलीस स्टेशनकडील अधिकृत पास सोबत बाळगतील.)

९)असुरक्षित व्यक्तींच्या संरक्षणाबाबत

६५ वर्षावरील जेष्ठ नागरिक, विकलांग व्यक्ती, गरोदर महिला आणि दहा वर्षाखालील मुले यांनी अत्यावश्यक आणि वैदयकीय कारण वगळता घरातच थांबणे आवश्यक आहे.

१०)आरोग्य सेतुच्या वापराबाबत

१) आरोग्य सेतु ॲप हे कोरोना संसर्गाच्या संभाव्य जोखमीची अगोदर ओळख करण्यास मदत करते. आणि ते व्यक्तींस आणि समाजास ढाल म्हणुन मदत करते.

२) कार्यालये व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता ठेवण्याच्या दृष्टीने अनुरुप मोबाईल फोन असलेल्या १००% सर्व कर्मचा-यांनी आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्याबाबत कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी.

३) नागरीकांनी त्यांच्या मोबाईल फोनवर आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्यांची आरोग्य विषयक दैनंदिन माहिती अदयावत करावी.

**११) विशेष प्रकरणांमध्ये व्यक्ती व वस्तु/मालाची हालचाल सुनिश्चित करण्यासाठी विशेष निर्देश-**

i) अंतरराज्य व राज्यांतर्गत सर्व वैदयकीय व्यावसायिक, स्वच्छता कर्मचारी, परिचारीका, लॅबटेक्नीशीयन, वैदयकीय कर्मचारी, रुग्णवाहीका व हॉस्पीटलशी संबंधीत सर्व सेवांना कोणत्याही प्रकारच्या निर्बंधाशिवाय परवानगी राहील.

ii) सर्व प्रकारच्या वस्तु/ मालाची आंतरराज्य वाहतुक तसेच रिकामे मालवाहु ट्रक वाहने यांना परवानगी राहील.

**१२) नॉन रेड झोन करीता – खालील सर्व बाबींना अटीच्या अधिन राहुन परवानगी आहे.**

या आदेशाच्या अनुच्छेद ५ मध्ये समाविष्ट बाबी वगळता तसेच स्पष्टपणे प्रतिबंधीत बाबी वगळता किंवा बंदी घातलेल्या बाबी वगळता अन्य सर्व बाबींना खालील अटींच्या अधिन राहून परवानगी आहे.

अ)परवानगी दिलेल्या बाबीं चालु करण्याकरीता कोणत्याही शासकीय प्राधीका-यांकडुन अनुमती/ मंजुरी घेण्याची आवश्यकता नसेल.

ब)क्रीडा संकुले, स्टेडीयम आणि सार्वजनिक मोकळया जागा वैयक्तिक व्यायामासाठी खुल्या राहतील. तथापि, प्रेक्षक व सामुहीक व्यायामप्रकार/ कार्यक्रम यांना परवागी नाही. सर्व शारिरीक व्यायाम व इतर हालचाली योग्य शारिरीक सामाजिक अंतराचे नियम पाळुन करता येतील.

क) सर्व सार्वजनिक व खाजगी प्रवासी वाहतुकीचे व्यवस्थापन खालील प्रमाणे चालु राहील

| | |
|---|---|
| दुचाकी | १ चालक |
| तीन चाकी | १ चालक व २ प्रवासी |
| चार चाकी | १ चालक व २ प्रवासी |

ड)टॅक्सी / कॅब / ॲटो रिक्षा यांना एक चालक व दोन प्रवासी अशी वाहतुक करण्यास परवानगी राहील.

Scanned with CamScanner

इ) जिल्हांतर्गत बस सेवा आसन क्षमतेच्या कमाल ५० % क्षमतेनुसार चालविण्यास परवानगी राहील तथापि बस मध्ये योग्य शारिरीक अंतराच्या नियमाचे पालन करणे आणि बसचे निर्जंतुकीकरण करणे आवश्यक राहील.

फ) अंतरजिल्हा बस सेवेबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

**१३) शॉपिंग मॉल व दुकाने –**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालीका हद्दीतील कंटेनमेंन्ट झोन बाहेरील सर्व बाजारपेठा/दुकाने (मॉल्स वगळुन) पिंपरी चिंचवड महापालिकेकडून विनिर्दिष्ट केलेप्रमाणे सकाळी ०९.०० ते संध्याकाळी ०५.०० वा. या कालावधीत सुरु राहतील. दुकानामध्ये वस्तु खरेदीसाठी गर्दी होवू नये व सुरक्षीत अंतर रहावे म्हणुन नागरिकांना उभे राहण्याच्या जागेवर ६ फुट अंतराच्या खुणा करुन ठेवाव्यात. व सामाजिक अंतर पाळले जाईल याची दक्षता घ्यावी.

ब) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कंटेनमेंन्ट झोन बाहेरील व महानगरपालिका हद्दीबाहेरील सर्व बाजारपेठा/ दुकाने (मॉल्स वगळुन) सकाळी ०९/०० ते सायंकाळी ०५/०० वा. या कालावधीत चालु करता येतील.जर कोणत्याही ठिकाणी गर्दी होत असल्यास किंवा योग्य सामाजिक अंतराच्या निकषांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा ठिकाणचे बाजार/ दुकाने तात्काळ बंद करण्यात येतील.

**१४) सरकारी व खाजगी कार्यालये (IT/ITES कंपन्यांसह)**

अ)पिंपरी चिंचवड आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कंटेनमेंन्ट झोन बाहेरील महापालिका हद्द वगळुन शासकीय व खाजगी कार्यालये १०० % मनुष्यबळासह चालू व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील शासकीय व खाजगी कार्यालये महापालिकेकडून विनिर्दिष्ट केलेल्या मनुष्यबळासह चालू राहतील.

ब) पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील कंटेनमेंन्ट झोन बाहेरील IT/ITES कंपन्या /वाणिज्यीक आस्थापना महानगरपालिका यांनी विनिर्दिष्ट केलेप्रमाणे सुरु राहतील.

**१५) उदयोग –**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कंटेनमेंन्ट झोन बाहेरील (पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील व उर्वरीत क्षेत्रातील) सर्व औदयोगीक/व्यावसायीक हालचालींना/उपक्रमांना परवानगी आहे.(आस्थापनामधील अधिकारी व कर्मचारी शक्यतो निश्चित केलेल्या वाहनातुन (Dedicated Vehicle) सामाजिक अंतर राखुन ने आण करतील.) परंतू पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील सर्व औद्योगीक उपक्रमातील मनुष्यबळ पिंपरी चिंचवड महापालिकेकडून विनिर्दिष्ट केले प्रमाणे राहील.

**१६) बांधकाम प्रकल्प -**

कंटेनमेंन्ट झोन बाहेरील सर्व बांधकाम प्रकल्पांना परवानगी राहिल परंतु सदर ठिकाणी काम करणा-या कामगारांना राहण्याची व भोजनाची व्यवस्था बांधकामाच्या ठिकाणीच (इनसीटु) करण्यात यावी. कामगारांचे थर्मल स्कॅनिंग व वैदयकीय तपासणी करावी. बांधकामाच्या जागेवर गर्दी टाळावी. सामाजिक अंतराचे काटेकोरपणे पालन करावे.कामगारांनी चेह-यावर मास्क परिधान करणे बंधनकारक राहील.कामगारांना सॅनिटायझर हॅन्डवॉश उपलब्ध करुन दयावा.

**१७)मद्य विक्री बाबत –**

राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयाकडील आदेश जाक्र.एफएलआर १०२०/कोविड-१९/७ मुंबई दिनांक ०३/०५/२०२० अन्वये मदय विक्रीच्या अनुज्ञप्तीबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आदेशान्वये मदय विक्री अनुज्ञप्तीबाबत कार्यवाही होईल.

**१८)ई - कॉमर्स –**

कंटेनमेंन्ट झोन बाहेरील क्षेत्रात ई-कॉमर्स सेवांमार्फत अत्यावश्यक वस्तु, औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि जिवनावश्यक मालाच्या तसेच अत्यावश्यक नसलेल्या मालाच्या वस्तुच्या विक्रीस परवानगी आहे.

Scanned with CamScanner

१९) कृषी व भाजी फळे मंडई –
कृषी उत्पन्न बाजार समितीतील व्यवहार व भाजीपाला बाजार मंडई आणि फळे विक्री मा.विभागीय आयुक्त पुणे आणि मा. आयुक्त महानगरपालिका पिंपरी चिंचवड यांनी विनिर्दिष्ट केले ठिकाणावर व वेळेप्रमाणे सुरु राहतील. मोशी कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच कंटेनमेन्ट बाहेरील सर्व भाजीपाला व फळे विक्री मंडई येथे दोन व्यक्ती मधील अंतर ६ फुट इतके राहील व मास्क परिधान करणे बंधनकारक राहील.

**२०)राज्य शासनाकडून अटी व शर्तीसह वेळोवेळी देण्यात आलेल्या परवानग्या यापुढेही चालु राहतील.**

**२१) कोव्हीड - १९ लॉकडाऊनच्या अनुषंगाने कशास परवानगी आहे आणि नाही हे सोईसाठी माहितीस्तव परिशिष्ट-१ अन्वये या आदेशासोबत जोडले आहे.**

**टीप** :-१) वरील नमुद सर्व सवलत दिलेले संबंधित अधिकारी कर्मचारी खाजगी व्यक्ती यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश ओळखपत्र याबाबतचा पुरावा सोबत बाळगणे बंधनकारक आहे.
२) वर नमुद ठिकाणी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडुन देण्यात आलेल्या आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच सामाजिक अंतर ठेवण्याबाबतच्या उपाययोजनांची दक्षता संबधीत कार्यालये, दुकान, आस्थापना यांचे चालक मालक, कार्यालय प्रमुख व्यवस्थापक यांनी घ्यावी.
३)रुग्ण वाहतुकीवेळी संबंधित रुग्णांनी दवाखान्यातील उपचाराबाबतची कागदपत्रे सोबत बाळगावीत.
४) कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी नेमणुक केलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्याबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.
५) वरील सर्व नमुद अपवादात्मक व्यक्ती व आस्थापना यांना कर्तव्याखेरीज ही सवलत लागु होणार नाही.

२२) नमुद सवलतींच्या निकषांची पुर्तता करतेवेळी सर्व संबंधितांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळणेकरिता आरोग्य विभागाकडुन सुचित केलेल्या खबरदारीच्या उपायांचे.**(उदा - मास्क,हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे)** काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

२३)सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२४) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक २१.०५.२०२० रोजी दिलेला आहे.

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :-२१.०५.२०२०

Scanned with CamScanner

परिशिष्ट-१

## कोव्हिड - १९ लॉकडाऊन -- ०४

### पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्र नॉन रेड झोन असून कार्यक्षेत्रातील मनपा क्षेत्र / उर्वरीत क्षेत्र/ कंटेनमेंन्ट क्षेत्र/ यामध्ये कशास परवानगी आहे आणि नाही याबाबतचा तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | तपशील | पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्र | पिं.चिं मनपा बाहेरील उर्वरित | कन्टेन्मेट क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | प्रवास-हवाई,रेल्वे,मेट्रो | नाही | नाही | नाही |
| २ | आंतरराज्य रस्ता वाहतूक | नाही | नाही | नाही |
| ३ | शिक्षण संस्था | नाही | नाही | नाही |
| ४ | आदरातिथ्य-हॉटेल्स | नाही | नाही | नाही |
| ५ | शॉपिंग मॉल्स् | नाही | नाही | नाही |
| ६ | धार्मिक स्थळे व मोठे मेळावा | नाही | नाही | नाही |
| ७ | मद्य दुकाने | होय | होय | नाही |
| ८ | ६५ वर्षावरील, १० वर्षाखालील व गरोदर महिला - बाहेर जाणे | नाही | नाही | नाही |
| ९ | वैद्यकीय चिकित्सालय, ओपीडी (बाह्यरुग्ण विभाग) | होय | होय | नाही |
| १० | टॅक्सी, कॅब, रिक्षा | १ + २ | १ + २ | नाही |
| ११ | चारचाकी वाहने | १ + २ | १ + २ | नाही |
| १२ | दुचाकी वाहने | १ | १ | नाही |
| १३ | आंतर जिल्ह्यातील बसेस | नाही | नाही | नाही |
| १४ | जिल्हा अंतर्गत बसेस | होय | होय | नाही |
| १५ | मालाचा पुरवठा | होय | होय | होय |
| १६ | उद्योग (शहरी) | होय | होय | नाही |
| १७ | उद्योग (ग्रामीण) | होय | होय | नाही |
| १८ | शहरी इन-सीटू बांधकाम | होय | होय | नाही |
| १९ | खाजगी बांधकामे | होय | होय | नाही |
| २० | शहरी स्वतंत्र दुकाने | होय | होय | नाही |
| २१ | अत्यावश्यक मालाची दुकाने | होय | होय | होय |
| २२ | ई-कॉम जिवनावश्यक वस्तू | होय | होय | नाही |
| २३ | ई-कॉम जिवनावश्यक नसलेल्या वस्तू | होय | होय | नाही |
| २४ | खाजगी आस्थापना | होय | होय | नाही |
| २५ | शासकीय आस्थापना | होय | होय | नाही |
| २६ | शेतीचे उपक्रम | होय | होय | नाही |
| २७ | बँक आणि वित्त सेवा | होय | होय | नाही |
| २८ | कुरिअर आणि पोस्ट सेवा | होय | होय | नाही |
| २९ | वैदयकीय अत्यावश्यक सेवा | होय | होय | होय |
| ३० | न्हाव्याची दुकाने, सलून, स्पा | होय | होय | नाही |
| ३१ | स्टेडियम प्रेक्षकांशिवाय | होय | होय | नाही |
| ३२ | घरपोच सेवा देणारे उपहारगृहे | होय | होय | नाही |
| ३३ | उपनिबंधक/RTO/Dy RTO | होय | होय | नाही |

Scanned with CamScanner